महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

---

**क्रमांक:रासेयो-२०२५/प्र.क्र.१११/रासेयो कक्ष** **दिनांक: १९ नोव्हेंबर, २०२५**

**प्रति,**
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित, सर्व विद्यापीठे/संचालनालये

**विषय:-** **सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विशेष निवासी शिबिराचे आयोजना बाबत..**

**संदर्भ:-** या कार्यासना समक्रमाकांचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५ चे पत्र कृ. पहावे

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यापीठ संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालयामध्ये वर्षातून एकदा विशेष निवासी शिबीराचे आयोजन दत्तक घेतलेल्या गावी माहे नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळा ऋतुमध्ये आयोजित करण्यात येते. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षात मिळून एकदा विशेष निवासी शिबिर करणे अनिवार्य आहे.

१. सन २०२५-२६ मधील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वार्षिक विशेष निवासी शिबिरांचे आयोजन दि.०१/११/२०२५ ते दि.३१/०१/२०२६ या कालावधीत आयोजित करणेबावत उक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात आलेले आहे.

२. रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी विद्यापीठ/संचालनालय संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावामध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष निवासी शिबिरांचे आयोजन दि.०५/११/२०२५ ते दि.३१/०१/२०२६ या कालावधीत करीत असताना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता रासेयो कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेली थीम ***"Youth for sustainable development with special focus on watershed management and wasteland development"*** ची अमंलबजावणी करावी. तसेच विहित मुदतीत विशेष शिबिरे आयोजित करण्यास्तव रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी सर्व कार्यक्रम अधिकारी यांना सूचित करावे. तसेच विशेष शिबिरे संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे व रासेयो राज्य संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन, यांना तात्काळ पाठविण्यात यावा.

**(डॉ.मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी, विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन